
श्रीलक्ष्मी-कुबेर पूजा







संपादक : विश्वनाथ केशव वैशंपायन

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई.

दीपावलीतील

श्रीलक्ष्मी-कुबेर-पूजा

संपादक
विश्वनाथ केशव वैशंपायन

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

किंमत पाच रुपये

पूजेचे साहित्य - दोन ताम्रकलश (एक पूजेसाठी पाणी ठेवण्याचा, दुसरा लक्ष्मीपूजनाकरिता पाण्याने अर्धा भरलेला). केळीचे पान, तीन पाट (एक पूजेत ठेवण्यासाठी, एक पुरोहिताला बसण्यासाठी, एक स्वतः पूजकाला बसण्यासाठी) दोन आसने, लक्ष्मीची मूर्ती किंवा लक्ष्मीची व सरस्वतीची तसबीर, तीन तबके/ताम्हने (एक कलशावर ठेवण्यासाठी, एक फुले ठेवण्यासाठी, एक आचमनादि कार्यासाठी), पूजेचे पदार्थ ठेवण्यासाठी एक मोठे ताट, एक भांडे, एक पळी, तीन वाट्या (एक गंधासाठी, एक अक्षतांसाठी व एक मोठी वाटी तीर्थ ठेवण्यासाठी), समई, नीरांजन, धूपारती, कापूरारती, समईत तेलवात, निरांजनात तूप व फुलवात, उदबत्तीचे घर, उदबत्त्या, शंख, घंटा, शंखाची बैठक, पंचामृताचे पाच पुडांचे कचोळे (दूध, दही, तूप, मध व साखर हे पाच पदार्थ कचोळ्यात घालून ठेवणे.), कुंकवाचा करंडा, रांगोळी, अत्तराची कुपी, नैवेद्य ठेवण्यासाठी मोठी पात्रे, दोन किलो तांदूळ, शुद्ध पाणी; उगाळलेले गंध (वाटीत), तांदूळ भिजवून कुंकू लावून केलेल्या अक्षता (एका वाटीत), अबीर, सिंदूर, काड्यांची पेटी, हळदीकुंकू, धने, गूळ-खोबरे, साखरफुटाणे, साळीच्या लाह्या, बत्तासे, पेढे, गुलाबपाणी (गुलाबदाणीत), अत्तरदाणी, विड्याची १० पाने, १० सुपाऱ्या, २ नारळ, एक उपरणे, एक खण, गणपतीसाठी कापसाची दोन वस्त्रे, ब्राह्मणाला देण्याची दक्षिणा, पूजेत ठेवण्याच्या दक्षिणेसाठी सुटी नाणी (सुमारे पाच रुपयांची), पूजनासाठी योग्य पात्रात दागिने, सोने नाणे, रत्ने, चांदीची नाणी, हिशेबाच्या नवीन संवत्सराच्या वह्या, दौत, टाक, लेखणी, तराजू, वजनेमापे,; दूर्वा, विविध प्रकारची फुले, फुलांच्या माळा, तोरणे, पताका, शक्य तेथे विजेच्या दिव्यांची रोषणाई; पूजा व आरती झाल्यावर वाजविण्यासाठी फटाके, आमंत्रितांसाठी बैठकीची व्यवस्था, विड्याचे साहित्य, पानसुपारी, आंब्याचे टहाळे (१ पूजेत कलशावर ठेवणे व १ किंवा २ दारावर टांगणे), निर्माल्यासाठी परडी, देवीला रात्री निद्रेसाठी एक छोटा पाट.

आवृत्ती पहिली : ३ नोव्हेंबर १९९१

मुद्रक
प्र. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाव वाडी, मुंबई - ४.

लेझरसेटिंग
अक्षय फोटोटाइपसेटर्स
जुन्या महापालिकेशेजारी,
ठाणे-४०० ६०१.

प्रकाशक
धनंजय बाळकृष्ण ढवळे, केशव भिकाजी ढवळे,
श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई - ४०० ००४.

प्रास्ताविक

ह्या पुस्तिकेत दीपावलीतील लक्ष्मीपूजनाचा पौराणिक विधी दिला असून त्यात गणपति पूजन, वरुण पूजन, लक्ष्मी पूजन, कुबेर पूजन, दौत, लेखणी, तराजू, वजनेमापे, दागिने, वह्या या सर्वांचे पूजन कसे करावे हे दिलेले आहे. दीपावलीत आश्विन अमावास्येला प्रदोषसमयी किंवा त्या तिथीला योग्य पूजाकाल कोणता ते पंचांगाधारे निश्चित करून हे पूजन करावयाचे असते. यात जरी मुख्यत: धनसंपत्तीची अर्थात् लक्ष्मी व कुबेर यांची पूजा अभिप्रेत असली तरी मनुष्याला इष्ट त्या सर्व सुखांचा व सोयींचा लाभ व्हावा, म्हणजेच, भुकेलेल्यास अन्न, तृषार्तास पाणी, अनाथास आधार, गृहहीनास निवास, अर्थार्जन नसेल त्याला अर्थार्जनाची संधी, विद्यार्थ्यास विद्या, धनार्थी व संतानार्थी भक्तांस धनसंपत्ती व संतती – सारांश जे जे भक्ताजवळ नाही व हवेसे वाटत असेल ते मिळावे, घरात शांती, मनात शांती, व्यवसायात उन्नती, अभ्यासात प्रगती, निराधारास सत्संगती, आरोग्य, आयुष्य, ऋद्धी सिद्धी, यश, कीर्ती – जे काही चांगले हवे असेल त्याचा लाभ व्हावा असा ह्या लक्ष्मी पूजनाचा हेतू आहे. ही पूजा भक्तिभावाने करून व इष्टमित्रांना बोलावून पूजेतील प्रसाद देऊन संतुष्ट करणाऱ्यास आयुष्यात काही कमी पडणार नाही अशी या लक्ष्मी पूजनाची ख्याती आहे. महालक्ष्मी व महासरस्वती या धन, संपदा व विद्यादायिनी असून परम कृपाळूपणे त्या भक्तांचे कल्याण करतात असा अनेकांचा परंपरागत अनुभव आहे.

दुकान, पेढी, कार्यालय, व्यवसायाची जागा किंवा स्वत:च्या घरी – लक्ष्मी पूजन करावे. त्या तिथीस दुपारपासूनच पूजेच्या तयारीस लागणे सोयीचे असते. पूजास्थान स्वच्छ करावे, रंग लावून, पताका, पुष्पमाळा, तोरणे, आम्रपल्लव, विजेची आरास करून ते सुशोभित करावे. इष्टमित्र, व्यापारी, सहव्यवसायी यांना निमंत्रणे पाठवावीत. 'लक्ष्मी' म्हणून नाणी, सोन्याचांदीचे दागिने, भांडी, पैसे यांची व्यवस्था करावी. लक्ष्मी पूजनासाठी घेतलेली नाणी वर्षभर तशीच जपून ठेवावीत, तसेच दरवर्षी यथाशक्ती त्यांत भर घालून वाढ करावी. सरस्वती पूजनासाठी जमाखर्चाच्या वह्या, रोजकीर्दीच्या चोपड्या, इत्यादि घेऊन नववर्षासाठी त्या उपयोगात आणावयाच्या म्हणून त्यांची पूजा करण्यासाठी त्यांच्या पहिल्या पृष्ठावर कुंकुममिश्रित गंधाने स्वस्तिक रेखाटावे, संवत्सर, तिथी, महिना यांचा तेथे उल्लेख करावा. **॥ शुभ ॥ ॥ लाभ ॥** असे लाल गंधाने त्या पृष्ठावर लिहावे. शाईच्या दौती, लेखणी, तराजू, वजने, मापे पूजेसाठी ठेवावीत. पाटावर किंवा पानावर पसाभर तांदूळ पसरून त्यावर कलश, कलशात (पुढे पूजेत सांगितल्याप्रमाणे) नाणी, फुले इत्यादि,

कलशावर आंब्याचा टहाळा, त्यावर तबक, तबकात तांदूळ, तांदळावर कुंकवाने स्वस्तिकाकृती, त्यावर लक्ष्मीची मूर्ती (कमलासनस्थ किंवा उभी) किंवा तसबीर, त्याच तबकात एक नारळ असे ठेवावे. पाटाच्या/पानाच्या एका बाजूस थोडे तांदूळ ठेवून वर गणपतिप्रतीक म्हणून एक सुपारी ठेवावी. जमाखर्चाच्या वह्या कलशासमोर, त्यांवरील **'शुभ लाभ'** अक्षरे दिसावीत अशा ठेवाव्यात. निमंत्रितांसाठी खुर्च्या, जाजम, लोड, तक्क्ये यथाशक्ती ठेवावे. त्यांच्या आदरातिथ्याची सोय असावी.

पूजकाने स्नान करून धूतवस्त्र किंवा रूढी असेल त्याप्रमाणे सोवळे नेसून (स्वच्छ, न फाटलेले, पीत, लाल, किंवा पांढरे वस्त्र असावे), उपरणे खांद्यावर घेऊन, स्वत:ला मंगलतिलक लावावा, घरातील देवांना व वडील मंडळींना नमस्कार करून, पुरोहिताचे स्वागत करावे, त्यालाही मंगलतिलक लावावा. पाटावर आसन घालून त्यावर बसावे. आपल्या जवळच पुरोहिताचे आसन असावे. पूजकाने डाव्या हातास पाण्याचा तांब्या, समोर ताम्हन, पळीभांडे, देवाजवळ समई लावलेली, उदबत्ती, निरांजन, शंख, घंटा यांच्या जागी ते ते ठेवावे. मग आचमनादि कर्मे करून पूजेस प्रारंभ करावा.

वातावरण शांत, प्रसन्न असावे. गोंधळ, गडबड, केरकचरा असू नये. दीपांचा प्रकाश सर्वत्र असावा. निमंत्रितांनीही स्वच्छता पाळावी.

ही पुस्तिका सर्वांना उपयुक्त ठरो हीच प्रार्थना.

७, शिवसदन, लिबर्टी गार्डन क्रॉस रोड नं. ३,
मालाड (पश्चिम), मुंबई ४०० ०६४.

वि. के. वैशंपायन

श्रीलक्ष्मी-कुबेर-पूजाविधी

✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡

पूजेला प्रारंभ करण्यापूर्वी स्वत:ला व पुरोहिताला मंगलतिलक लावावा. मग आसनावर बसून पूजेस प्रारंभ करावा.

सूचना – * अशी खूण केलेले मंत्र पुरोहिताने म्हणावेत.

आचमन – (दोनदा आचमन)

कलशातील पाणी भांड्यात घ्यावे. भांड्यातील पाणी एकेक पळी उजव्या तळहातावर घेऊन, पुढे दिलेल्या पहिल्या तीन नामांनी ते प्राशन करावे. **ॐ गोविंदाय नम:।** म्हणताना एक पळी पाणी उजव्या हातावरून ताम्हनात सोडावे. असे दोनदा करून मग '**ॐ विष्णवे नम:।**' ते '**ॐ श्रीकृष्णाय नम:।**' ही नामे, हात जोडून म्हणावीत.

ॐ केशवाय नम:। ॐ नारायणाय नम:। ॐ माधवाय नम:।
ॐ गोविन्दाय नम:। पुन्हा
ॐ केशवाय नम:। ॐ नारायणाय नम:। ॐ माधवाय नम:।
ॐ गोविंदाय नम:। ॐ विष्णवे नम:। ॐ मधुसूदनाय नम:।
ॐ त्रिविक्रमाय नम:। ॐ वामनाय नम:। ॐ श्रीधराय नम:।
ॐ हृषीकेशाय नम:। ॐ पद्मनाभाय नम:। ॐ दामोदराय नम:।
ॐ संकर्षणाय नम:। ॐ वासुदेवाय नम:। ॐ प्रद्युम्नाय नम:।
ॐ अनिरुद्धाय नम:। ॐ पुरुषोत्तमाय नम:। ॐ अधोक्षजाय नम:।
ॐ नारसिंहाय नम:। ॐ अच्युताय नम:। ॐ जनार्दनाय नम:।
ॐ उपेन्द्राय नम:। ॐ हरये नम:। ॐ श्रीकृष्णाय नम:।

प्राणायाम : दोनदा प्रणायाम करावा. प्रथम डाव्या नाकपुडीने श्वास आत घ्यावा, पाच सेकंद कुंभक करून उजव्या नाकपुडीने संथपणे श्वास सोडावा. नंतर हीच कृती उजव्या नाकपुडीने श्वास घेऊन व डाव्या नाकपुडीने श्वास सोडून करावी.

*** ॐ प्रणवस्य परब्रह्म ऋषि:। परमात्मा देवता। दैवी गायत्रीच्छंद:। सप्तानां व्याहृतीनां विश्वामित्र, जमदग्नि, भरद्वाज, गौतम, अत्रि, वसिष्ठ, काश्यप ऋषय:। अग्नि, वायु, आदित्य, बृहस्पति, वरुण, इन्द्र, विश्वेदेवा देवता:। गायत्री, उष्णिक्, अनुष्टुब्, बृहती, पंक्ति, त्रिष्टुब्, जगत्यश्छदांसि। गायत्र्या**

गाथिनो विश्वामित्र ऋषि:। सविता देवता। गायत्रीच्छंद:। गायत्रीशिरस: प्रजापतिर्ऋषि:। ब्रह्मा, अग्नि, वायु, आदित्य, देवता:। यजुश्छंद:। प्राणायामे विनियोग:। ॐ भू:। ॐ भुव:। ॐ स्व:। ॐ मह:। ॐ जन:। ॐ तप:। ॐ सत्यम्। ॐ भूर्भुव: स्व:। ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि। धियो यो न: प्रचोदयात्। ॐ आपो ज्योती रसोऽमृतं ब्रह्मभूर्भुव: स्वरोम्।

देवतावंदन व प्रार्थना – (हात जोडून पुढील नमने व प्रार्थना म्हणावी.) –

वंदन – श्रीमन्महागणपतये नम:। इष्टदेवताभ्यो नम:। श्रीसरस्वत्यै नम:। श्रीगुरुभ्यो नम:। कुलदेवताभ्यो नम:। ग्रामदेवताभ्यो नम:। स्थानदेवताभ्यो नम:। वास्तुदेवताभ्यो नम:। श्रीमहालक्ष्मीमहासरस्वतीभ्यां नम:। आदित्यादिनवग्रह- देवताभ्यो नम:। सर्वेभ्यो देवेभ्यो नम:। मातापितृभ्याम् नम:। सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमोनम:। प्रारब्धकार्यं निर्विघ्नमस्तु।

प्रार्थना

सुमुखश्चैकदन्तश्च कपिलो गजकर्णक:।
लम्बोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिप:॥ १॥
धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचन्द्रो गजानन:।
द्वादशैतानि नामानि य: पठेत् शृणुयादपि॥ २॥
विद्यारम्भे विवाहे च प्रवेशे निर्गमे तथा॥
संग्रामे संकटे चैव विघ्नस्तस्य न जायते॥ ३॥
शुक्लांबरधरं देवं शशिवर्णं चतुर्भुजम्।
प्रसन्नवदनं ध्यायेत् सर्वविघ्नोपशान्तये॥ ४॥
सर्वमंगलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तु ते॥ ५॥
सर्वदा सर्वकार्येषु नास्ति तेषाममङ्गलम्।
येषां हृदिस्थो भगवान् मङ्गलायतनं हरि:॥ ६॥
तदेव लग्नं सुदिनं तद्वेव, ताराबलं चन्द्रबलं तदेव।
विद्याबलं दैवबलं तदेव, लक्ष्मीपते तेंऽघ्रियुगं स्मरामि॥ ७॥
लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजय:।
येषामिन्दीवरश्यामो हृदयस्थो जनार्दन:॥ ८॥
विनायकं गुरुं भानुं ब्रह्मविष्णुमहेश्वरान्।
सरस्वतीं प्रणौम्यादौ सर्वकार्यार्थ सिद्धये॥ ९॥

अभिप्सितार्थ सिद्ध्यर्थं पूजितो यः सुरासुरैः।
सर्वविघ्नहरस्तस्मै गणाधिपतये नमः॥ १०॥
सर्वेष्वारब्धकार्येषु त्रयस्त्रिभुवनेश्वराः।
देवा दिशन्तु नः सिद्धिं ब्रह्मेशानजनार्दनाः॥ ११॥

देशकालोच्चारण – तिथिर्विष्णुस्तथा वारो नक्षत्रं विष्णुरेव च। योगश्च करणं चैव सर्वं विष्णुमयं जगत्। अद्य एवंगुणविशेषणविशिष्टायां शुभपुण्यतिथौ –

संकल्प – (हातात अक्षता घेऊन त्या पळीभर पाण्यासह ताम्हनात सोडाव्यात.) –

मम आत्मनः सकलशास्त्र पुराणोक्तफलप्राप्त्यर्थं – श्रीभगवती लक्ष्मीदेवताप्रीत्यर्थम्, अस्माकं सर्वेषां सकलकुटुंबानां द्विपदचतुष्पदसहितानां क्षेमस्थैर्य, अभय, आयु, आरोग्य, ऐश्वर्य, अभिवृद्ध्यर्थं समस्तमंगलावाप्त्यर्थं समस्ताभ्युदयार्थं च अप्राप्तलक्ष्म्याः प्राप्त्यर्थं प्राप्तलक्ष्म्याः चिरकालवासार्थं अद्य अश्विनकृष्ण – अमावास्यायां प्रतिवार्षिक – विहितम्, यथाज्ञानेन यथामीलितोपचारद्रव्यैः श्रीलक्ष्मी (कुबेर) श्रीसरस्वतीपूजनम् करिष्ये तदंगत्वेन कलशाराधनं आदौ निर्विघ्नतासिद्ध्यर्थं महागणपतिपूजनं, कलशघंटापूजनादि तथा लेखनी-मषीपात्रादीनां च पूजामहं करिष्ये।

(हातातील पाणी ताम्हनात सोडावे.)

आसनशुद्धि – (भूमीला उजव्या हाताने स्पर्श करावा.) –

* पृथ्वीति मंत्रस्य मेरुपृष्ठ ऋषिः। कूर्मो देवता। सुतलं छंदः। आसने विनियोगः।

(पृथ्वी) ॐ पृथ्वि त्वया धृता लोका देवि त्वं विष्णुना धृता।
त्वं च धारय मां देवि पवित्रं कुरु चासनम्॥

(चामुंडा) ऊर्ध्वकेशि विरूपाक्षि मांसशोणितभोजने।
तिष्ठ देवि शिखाबंधे चामुंडे त्वपराजिते॥

(भूतोत्सारण) अपक्रामन्तु भूतानि पिशाचाः सर्वतो दिशम्।
सर्वेषामविरोधेन पूजाकर्म समारभे॥

(भैरवप्रार्थना) तीक्ष्णदंष्ट्र महाकाय कल्पांतदहनोपम।
भैरवाय नमस्तुभ्यमनुज्ञां दातुमर्हसि॥

षडंगन्यास (सहा ठिकाणी स्पर्श करून न्यास करावा)

(हृदयास हस्तस्पर्श) श्रीमहालक्ष्म्यै नमः। हृदयाय नमः।

(मस्तकाला हस्तस्पर्श) श्रीमहालक्ष्म्यै नमः। शिरसे स्वाहा।

(शिखास्थानीं हस्तस्पर्श) श्रीमहालक्ष्म्यै नमः। शिखायै वषट्।

(दोन्ही हात जोडून समोर धरून आपल्याकडे वरून बाहेरून आत वळवावेत.)

श्रीमहालक्ष्म्यै नमः। कवचाय हुम्।

(दोन्ही डोळे व भ्रूमध्य या ठिकाणी (डोळे मिटून) उजव्या हाताची अनामिका मध्यमा आणि तर्जनी या तीन बोटांनी स्पर्श करावा व उजवा हात डोक्यावरून मागे न्यावा.)

श्रीमहालक्ष्म्यै नमः। नेत्रत्रयाय वौषट्।

(मंत्रांनंतर डाव्या हातावर उजव्या हाताचे मधले बोट व अनामिका यांनी टाळी वाजवावी)

श्रीमहालक्ष्म्यै नमः। अस्त्राय फट्।

कलशपूजा – स्वच्छ पाण्याने भरलेल्या तांब्यावर उजवा हात पालथा ठेवावा. गंध-अक्षता लावलेले फूल चिकटवावे.

कलशस्य मुखे विष्णुः कंठे रुद्रः समाश्रितः।
मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणाः स्मृताः॥ १॥
कुक्षौ तु सागराः सर्वे सप्तद्वीपा वसुंधरा।
ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदो ह्यथर्वणः।
अंगैश्च सहिताः सर्वे कलशं तु समाश्रिताः।
अत्र गायत्री सावित्री शांतिः पुष्टिकरी तथा।
आयान्तु देवपूजार्थम् दुरितक्षयकारकाः॥
गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति।
नर्मदे सिंधुकावेरि जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु॥
कलशदेवताभ्यो नमः। सकलपूजार्थे गंधाक्षतपुष्पाणि समर्पयामि।

(या कलशातील पाणी पूजेसाठी घ्यायचे आहे. कलशाची पुढीलप्रमाणे प्रार्थना करावी) –

कलशः कीर्तिमायुष्यं प्रज्ञां मेधां श्रियं बलम्।
योग्यतां पापहानिं च पुण्यं वृद्धिं च यच्छति॥
सर्वतीर्थमयो यस्मात्सर्वदेवमयो यतः।
अतो हरिप्रियोऽसि त्वं पूर्णकुंभ नमोऽस्तुते॥

शंखपूजा – (शंख असल्यास शंखाला स्नान घालून, पुसून जागेवर ठेवून त्याला गंधफूल वाहावे. अक्षता वर्ज्य. शंखात तीन पळ्या शुद्ध पाणी घालावे. पाण्यात तुळसीपत्र ठेवावे. तो देवाच्या उजव्या बाजूस ठेवावा.)

ॐ शंखादौ चंद्रदैवत्यं कुक्षौ वरुणदेवता।
पृष्ठे प्रजापतिश्चैव अग्रे गंगा सरस्वती।
त्रैलोक्ये यानि तीर्थानि वासुदेवस्य चाज्ञया।

शंखे तिष्ठंति विप्रेन्द्र तस्मात् शंखं प्रपूजयेत्।
त्वं पुरा सागरोत्पन्नो विष्णुना विधृत: करे।
नमित: सर्वदेवैश्च पांञ्चजन्य नमोऽस्तुते॥

* ॐ पाञ्चजन्याय विद्महे। पावमानाय धीमहि। तन्न: शंख: प्रचोदयात्।
शंखदेवताभ्यो नम:। सकलपूजार्थे गंधपुष्पं तुलसीपत्रं च समर्पयामि।

घंटापूजा – (घंटेला स्नान घालून पुसून ती जागेवर ठेवून हळदकुंकू गंधाक्षता व फूल वाहावे. नंतर थोडी वाजवावी.) –

आगमार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम्।
कुर्वे घंटारवं तत्र देवताऽऽह्वानलक्षणम्॥

घंटायै नम:। सकलपूजार्थे हरिद्राकुंकुमं गंधाक्षतपुष्पं च समर्पयामि

दीपपूजा – (समईला हळदकुंकू गंधफूल व अक्षता वाहून नमस्कार करावा.) –

भो दीप ब्रह्मरूपस्त्वं ज्योतिषां प्रभुरव्यय:।
आरोग्यं देहि पुत्रांश्च सर्वार्थांश्च प्रयच्छ मे॥
यावत्पूजासमाप्ति: स्यात्तावत् त्वं सुस्थिरो भव॥

दीपदेवताभ्यो नम:। सकलपूजार्थे हरिद्राकुंकुमं गंधाक्षतपुष्पंच समर्पयामि। नमस्करोमि।

मंडपपूजा – (लक्ष्मीपूजनासाठी असलेल्या देव्हाऱ्याची पूजा गंधफूल वाहून करावी.) –

उत्तमोज्ज्वलकांचनेन रचितं तुङ्गांगरंगस्थलम्।
शुद्धस्फाटिकभित्तिकाविलसितैस्स्तंभैश्च हेमै: शुभै:॥
मुक्ताजालविलंबिमंडलयुतं वज्रैश्च सोपानकै:।
नानारत्नविराजितैश्च कलशैरत्यन्तशोभावहै:॥ १॥
द्वारैश्चामररत्नराजखचितै: शोभावहैर्मण्डितम्।
रत्नाग्र्यैरपि शंखपद्मधवलप्रभ्राजितस्वस्तिकै:॥
माणिक्योज्ज्वलदीपदीप्तिविलसल्लक्ष्मीविलासास्पदम्।
ध्यायेन्मंडपमर्चनेषु सकलेष्वेवंविधं साधक:॥ २॥

मंडपदेवताभ्यो नम:। सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।

पूजासामग्री प्रोक्षण – (तुलसीदलाने पूजासामग्रीवर व स्वत:वर जल प्रोक्षण करून शुद्धी करावी.) –

अपवित्र: पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपि वा।
य: स्मरेत्पुण्डरीकाक्षं स बाह्याभ्यंतर: शुचि:॥

गणपति पूजन

(पाटावर किंवा पात्रात थोडे तांदूळ पसरून त्यावर गणपतीचे प्रतीक म्हणून सुपारी ठेवावी. तीवर अक्षता वाहून नमस्कार करावा व ध्यान करावे.) –

* गणानां त्वा शौनको गृत्समदो गणपतिर्जगती। गणपतिपूजने विनियोगः।

ॐ गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम्।
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः शृण्वन्नूतिभिः सीदसादनम्॥
वक्रतुण्ड महाकाय कोटिसूर्यसमप्रभ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा॥

ॐ भूर्भुवःस्वः। श्रीमहागणाधिपतये नमः। अस्मिन्पूगीफले श्रीमहागणपतिं सांगं सपरिवारं सायुधं सशक्तिकमावाहयामि।

(आवाहन व आसन म्हणून दोन दूर्वा ठेवाव्यात व त्यांवर सुपारी ठेवावी.) –

श्रीमहागणपतये नमः। आवाहयामि।
श्रीमहागणपतये नमः आसनार्थे दूर्वांकुरान् समर्पयामि।

(फुलाने पळीत पाणी घेऊन शिंपडावे.) –

श्रीमहागणपतये नमः। पादयोः पाद्यं समर्पयामि।

(पळीभर पाण्यात गंधाक्षता व फूल घेऊन सुपारीवर वाहावे.) –

श्रीमहागणपतये नमः। अर्घ्यं समर्पयामि।

(पळीत पाणी घेऊन फुलाने शिंपडावे.) –

श्रीमहागणपतये नमः। आचमनीयं समर्पयामि।

(पळीत पाणी घेऊन पुन्हा फुलाने शिंपडावे.) –

श्रीमहागणपतये नमः। स्नानं समर्पयामि।

(कापसाची वस्त्रे वाहावीत.) –

श्रीमहागणपतये नमः। वस्त्रं समर्पयामि।

(जानवे किंवा तदर्थ अक्षता वाहाव्यात.) –

श्रीमहागणपतये नमः। यज्ञोपवीतं समर्पयामि। (किंवा)
यज्ञोपवीतार्थे अक्षतान् समर्पयामि।

(चंदनाचे कुंकुममिश्रित गंध फुलाने वाहावे.) –

श्रीमहागणपतये नमः। विलेपनार्थे चंदनं समर्पयामि।

(अक्षता वाहाव्यात.) –

श्रीमहागणपतये नमः। अलंकारार्थे अक्षतान् समर्पयामि।

(श्रीगणेशांगभूत ऋद्धिसिद्धींची पूजा – हळदकुंकू सुपारीवर वाहावे.) –

श्रीऋद्धिसिद्धिभ्यां नमः। हरिद्राकुंकुमं सौभाग्यद्रव्यं समर्पयामि।

(फुले वाहावीत. ही सुपारीच्या मानाने स्वल्प असावीत.) –

श्रीमहागणपतये नमः। पूजार्थे पुष्पाणि समर्पयामि।

(उदबत्ती लावून ती उजव्या हाताने देवाला ओवाळावी. डाव्या हातात घंटा घेऊन त्यावेळी घंटानाद करावा.) –

श्रीमहागणपतये नमः। धूपं समर्पयामि।

(नीरांजन लावून उदबत्तीप्रमाणेच ओवाळावे. त्यावेळी घंटानाद करावा.) –

श्रीमहागणपतये नमः। दीपं समर्पयामि।

(सुपारीसमोर पाटावर पाण्याने लहानसा चौकोन करून त्यावर दूध किंवा जो नैवेद्य असेल तो ठेवावा. त्याभोवती पाणी परिसिंचन करावे व नैवेद्यावर दूर्वेने किंवा फुलाने पाणी शिंपडावे. प्राणाय स्वाहा इत्यादि स्वाहाकार दोनदा म्हणावेत. प्रत्येक वेळी देवाला घास भरवीत आहोत अशी क्रिया उजव्या हाताने करावी.) –

श्रीमहागणपतये नमः। (नैवेद्याचे नाव घ्यावे) **नैवेद्यं समर्पयामि।**

ऋतं त्वा सत्येन परिषिंचामि।

ॐ प्राणाय स्वाहा। ॐ अपानाय स्वाहा। ॐ व्यानाय स्वाहा।

ॐ उदानाय स्वाहा। ॐ समानाय स्वाहा। ॐ ब्रह्मणे स्वाहा।

(फुलाने पाणी शिंपडावे.) –

नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि। पुनर्नैवेद्यं समर्पयामि।

ॐ प्राणाय स्वाहा। ॐ अपानाय स्वाहा। ॐ व्यानाय स्वाहा।

ॐ उदानाय स्वाहा। ॐ समानाय स्वाहा। ॐ ब्रह्मणे स्वाहा।

(एकेक पळी पाणी फुलाने शिंपडत पुढीलप्रमाणे क्रमाने म्हणावे.) –

उत्तरापोशनं समर्पयामि। मुखप्रक्षालनं समर्पयामि। हस्तप्रक्षालनं समर्पयामि।

(गंध फुलाने वाहावे.) –

करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि।

(विड्याची दोन पाने त्यावर सुपारी व दक्षिणा ठेवून त्यावर पळीभर पाणी सोडावे.) –

श्रीमहागणपतये नमः मुखवासार्थे पूगीफलतांबूलं समर्पयामि।

दक्षिणां समर्पयामि।

(नारळ ठेवून त्यावर पळीभर पाणी सोडावे.) –

श्रीमहागणपतये नमः। फलार्थे नारिकेलफलं समर्पयामि।

(दूर्वांकुर व पुष्प वाहून नमस्कार करावा व कार्यसिद्धीसाठी प्रार्थना करावी.) –

श्रीमहागणपतये नमः। दूर्वांकुरान् मंत्रपुष्पं च समर्पयामि। नमस्करोमि।

कार्यं मे सिद्धिमायातु प्रसन्ने त्वयि धातरि।

विघ्नानि नाशमायान्तु सर्वाणि सुरनायक॥

वक्रतुंड महाकाय कोटिसूर्यसमप्रभ।

निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा॥

श्रीमहागणपतये नमः। निर्विघ्नं कुरु।

अनेन कृतषोडशोपचारपूजनेन श्रीमहागणपतिः प्रीयताम्।

वरुणस्थापना व पूजा

श्रीलक्ष्मीपूजनासाठी कलशाची स्थापना करावयाची असते. प्रथम हात जोडून भूमीची प्रार्थना करावी.

ॐ भूर्भुवःस्वः। पृथिवीं नमस्करोमि।

(नंतर पसाभर तांदूळ केळीच्या पानावर किंवा पाटावर पसरावेत, त्यांवर पाण्याने अर्धा भरलेला कलश ठेवावा. कलशाची स्थापना करताना असे म्हणावे.) –

ॐ वरुणाय नमः। कलशे शुद्धोदकं क्षिपामि।

(कलशाला बाहेरून तीन बोटे उभे गंध लावावे व फूल चिकटवावे.) –

ॐ वरुणाय नमः। कलशमध्ये वरुणमावाहयामि। गंधपुष्पं समर्पयामि।

(कलशावर आंब्याचा टहाळा, पाने उताणी ठेवून ती चारी बाजूस कलशावर बसतील अशा प्रकारे, ठेवावा.) –

ॐ वरुणाय नमः। आम्रपल्लवं समर्पयामि।

(कलशात दोन दूर्वा घालाव्यात.) –

ॐ वरुणाय नमः। दूर्वांकुरान् समर्पयामि।

(कलशात दोन सुपाऱ्या घालाव्यात.) –

ॐ वरुणाय नमः। पूगीफले समर्पयामि।

(कलशात सोने, चांदीची नाणीं, रत्न, यथाशक्ती घालावे.) –

ॐ वरुणाय नमः। यथाशक्ति सुवर्णरत्नादि-द्रव्यं समर्पयामि।

(कलशात फूल, तुळशीचे पान व थोड्या अक्षता घालाव्यात.) –

ॐ वरुणाय नमः। पुष्पं तुलसीदलमक्षतान् च समर्पयामि।

(कलशावर ताम्हन किंवा धातूचे सुंदर तबक ठेवावे. त्यात पसाभर तांदूळ पसरावेत. तांदळांवर कुंकवाने स्वस्तिक काढावे. त्यावर एक नारळ ठेवावा.) –

ॐ वरुणाय नमः। पूर्णपात्रं स्थापयामि।

वरुणाला आवाहन

(कलशाला दोन्ही हात लावावेत.) –

ॐ वरुणाय नमः। अस्मिन् कलशे वरुणं सांगं सपरिवारं सायुधं सशक्तिकमावाहयामि।

(ताम्हनावरच गंधाक्षता व फूल अर्पण करावे.) –

ॐ वरुणाय नमः। सकलपूजार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।

कलशप्रार्थना – (हात जोडून पुढील श्लोक म्हणावेत.) –

देवदानवसंवादे मथ्यमाने महोदधौ।
उत्पन्नोऽसि तदा कुंभ विधृतो विष्णुना स्वयम्॥ १॥
त्वत्तोये सर्वतीर्थानि देवाः सर्वे त्वयि स्थिताः।
त्वयि तिष्ठन्ति भूतानि त्वयि प्राणाः प्रतिष्ठिताः॥ २॥
शिवः स्वयं त्वमेवासि विष्णुस्त्वं च प्रजापतिः।
आदित्या वसवो रुद्रा विश्वेदेवा सपैतृकाः॥ ३॥
त्वयि तिष्ठन्ति सर्वेऽपि यतः कामफलप्रदाः।
त्वत्प्रसादादिमां पूजां कर्तुमीहे जलोद्भव॥ ४॥
सान्निध्यं कुरु मे देव प्रसन्नो भव सर्वदा॥
ॐ वरुणाय नमः। वरुणं प्रार्थये।

(कलशात वरुणदेवता स्थानापन्न झाली आहे.)

श्रीलक्ष्मीसरस्वती-इत्यादि देवता पूजा

(कलशाजवळच जमाखर्चाच्या वह्या, लेखणी, दौत, तराजू, वजने इत्यादि ठेवावे. वह्या त्यांचे पहिले पान उघडून ठेवाव्यात. लक्ष्मी-कुबेर व सरस्वतीस्वरूप म्हणून (१) चांदीचे लक्ष्मी छापाचे नाणे, (२) सुवर्णादि धातूचे दागिने, (३) लक्ष्मी व

सरस्वती मूर्ती, (४) लक्ष्मी व सरस्वती यांच्या तसबिरी ठेवाव्यात. मूर्ती किंवा नाणे ताम्हनात तांदळांवर ठेवावे. दागिने पाटावर वस्त्र घालून त्यावर ठेवावेत. तसबिरी पाटावर, चौरंगावर किंवा भिंतीला टेकून ठेवाव्यात.) –

श्रीलक्ष्मीध्यान

या सा पद्मासनस्था विपुलकटितटी पद्मपत्रायताक्षी।
गंभीरावर्तनाभिः स्तनभरनमिता शुभ्रवस्त्रोत्तरीया॥
या लक्ष्मीर्दिव्यरूपैर्मणिगणखचितैः स्नापिता हेमकुंभैः।
सा नित्यं पद्महस्ता मम वसतु गृहे सर्वमांगल्यमस्तु॥
नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः।
नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम्॥
या देवी सर्वभूतेषु लक्ष्मीरूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः॥

श्रीसरस्वतीध्यान

नमस्ते शारदे देवि काश्मीरपुरवासिनि।
त्वामहं प्रार्थये नित्यं विद्यादानं च देहि मे॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। ध्यानं समर्पयामि।

आवाहन – (देवीवर अक्षता वाहाव्यात.) –

सर्वलोकस्य जननीं शूलहस्तां त्रिलोचनाम्।
सर्वदेवमयीमीशां देवीमावाहयाम्यहम्॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। आवाहयामि।
आवाहनार्थे अक्षतान् समर्पयामि।

आसन – (देवीच्या मूर्तीखाली अक्षता ठेवाव्यात.) –

तप्तकांचनवर्णाभं मुक्तामणिविराजितम्।
अमलं कमलं दिव्यमासनं प्रतिगृह्यताम्॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। आसनं समर्पयामि।
(आसनार्थे अक्षतान् समर्पयामि।)

पाद्य – (पळीभर पाणी फुलाने शिंपडावे.) –

गंगादितीर्थसंभूतं गंधपुष्पाक्षतैर्युतम्।
पाद्यं ददाम्यहं देवि गृहाणाशु नमोऽस्तु ते॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। पादयोः पाद्यं समर्पयामि।

अर्घ्य – (पळीभर पाण्यात गंधअक्षता घालून ते फुलाने शिंपडावे.) –

अष्टगंधसमायुक्तं स्वर्णपात्रप्रपूरितम्।
अर्घ्यं गृहाण मद्दत्तं महालक्ष्मि नमोऽस्तु ते॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। अर्घ्यं समर्पयामि।

आचमन – (फुलाने पाणी शिंपडावे.) –

सर्वलोकस्य या शक्तिर्ब्रह्मविष्णवादिभिः स्तुता।
ददाम्याचमनं तस्यै महालक्ष्म्यै मनोहरम्॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। आचमनीयं समर्पयामि।

पंचामृतस्नान – देवीची मूर्ती असेल तर ती ताम्हनात घेऊन तीवर पंचामृतातील दूध, दही, तूप, मध व साखर हे पदार्थ एकेक, पुढीलप्रमाणे वाहावेत. प्रत्येक पदार्थानंतर शुद्धोदक अर्पण करावे. तसबीर असेल तर पंचामृताचे पदार्थ फुलाने किंचित् शिंपडावेत व शुद्धोदक उजव्या हाताने ताम्हनात सोडावे.

पंचामृतसमायुक्तं जान्हवीसलिलं शुभम्।
गृहाण विश्वजननि स्नानार्थं भक्तवत्सले॥
पयो दधि घृतं चैव मधुशर्करया युतम्।
पंचामृतेन स्नपनं क्रियतां परमेश्वरि॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः।

(या मंत्राने पुढील क्रमाने एकैकशः पंचामृत व जल अर्पण करावे.) –

(१) श्रीमहा० पयःस्नानं समर्पयामि। शुद्धोदकस्नानं समर्पयामि।
(२) श्रीमहा० दधिस्नानं समर्पयामि। शुद्धोदकस्नानं समर्पयामि।
(३) श्रीमहा० घृतस्नानं समर्पयामि। शुद्धोदकस्नानं समर्पयामि।
(४) श्रीमहा० मधुस्नानं समर्पयामि। शुद्धोदकस्नानं समर्पयामि।
(५) श्रीमहा० शर्करास्नानं समर्पयामि। शुद्धोदकस्नानं समर्पयामि।
(६) श्रीमहा० गंधोदकस्नानं समर्पयामि।
(७) श्रीमहा० शुद्धोदकस्नानं समर्पयामि।
(८) (अत्तर फुलाने लावावे) – **श्रीमहा० मांगलिकस्नानं समर्पयामि।**
(९) (पाणी गरम करून ते वाहावे.) **श्रीमहा० उष्णोदकस्नानं समर्पयामि।**
(१०) (गंधफूल वाहावे.) **श्रीमहा० सकलपूजार्थे गंधपुष्पं समर्पयामि।**

पूर्वपूजा (पंचोपचार)

(देवीची मूर्ती पुसावी. ताम्हनातील पाणी तीर्थपात्रात काढून ठेवावे.)

(१) (गंध लावावे.) – **श्रीमहा० विलेपनार्थे चंदनं समर्पयामि।**

(२) (फूल वाहावे.) – **श्रीमहा० पूजार्थे पुष्पं समर्पयामि।**

(३) (धूप किंवा उदबत्ती, घंटानाद करीत ओवाळावी.) **श्रीमहा० धूपं समर्पयामि।**

(४) (निरांजन, घंटानाद करीत ओवाळावे.) **श्रीमहा० दीपं समर्पयामि।**

(५) (देवीला पंचामृताचा नैवेद्य दाखवावा – पाटावर पाण्याने लहानसा चौकोन करून त्यावर पंचामृताचे कचोळे ठेवावे. त्याभोवती उजव्या हाताने पाणी परिसिंचन करावे व नैवेद्यावरही फुलाने किंचित् पाणी शिंपडावे. **प्राणाय स्वाहा।** इत्यादि प्राणाहुती दोनदा म्हणाव्यात, उजव्या हाताने देवीला नैवेद्य भरवीत आहोत अशी क्रिया करावी.) –

श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। पंचामृतनैवेद्यं समर्पयामि।
ऋतं त्वा सत्येन परिषिंचामि।
ॐ प्राणाय स्वाहा। ॐ अपानाय स्वाहा। ॐ व्यानाय स्वाहा।
ॐ उदानाय स्वाहा। ॐ समानाय स्वाहा। ॐ ब्रह्मणे स्वाहा।

(पळीभर पाणी ताम्हनात सोडावे) –

नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि। पुनर्नैवेद्यं समर्पयामि।
ॐ प्राणाय स्वाहा। ॐ अपानाय स्वाहा। ॐ व्यानाय स्वाहा।
ॐ उदानाय स्वाहा। ॐ समानाय स्वाहा। ॐ ब्रह्मणे स्वाहा।

(एक एक पळी पाणी उजव्या हाताने ताम्हनात सोडावे.) –

उत्तरापोशनं समर्पयामि। मुखप्रक्षालनं समर्पयामि। हस्तप्रक्षालनं समर्पयामि।

(गंध फुलाने वाहावे) –

करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि।

(विड्याच्या दोन पानांवर सुपारी व दक्षिणा ठेवावी. पळीभर पाणी तीवर सोडावे.)
श्रीमहा० मुखवासार्थे पूगीफल तांबूलं समर्पयामि। दक्षिणां समर्पयामि।
(गंधाक्षता पुष्प वाहावे.) **श्रीमहा० मंत्रपुष्पं समर्पयामि।**

(ताम्हनात उजव्या हाताने पळीभर पाणी सोडावे.)
अनेन पूर्वपूजनेन श्रीमहालक्ष्मीसरस्वत्यौ प्रीयताम्।

अभिषेक – लक्ष्मीची मूर्ती असेल तर ताम्हनात ठेवून पळी पळी पाण्याने अभिषेक करावा, तसबीर असेल तर फुलाने पाणी शिंपडीत असतां श्रीसूक्त किंवा या पुस्तकात शेवटी दिलेली देवीची १०८ नावे म्हणावीत.

श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। महाभिषेकस्नानं समर्पयामि।

शुद्धोदकस्नानं समर्पयामि।

(अभिषेकानंतर गंधाक्षता व फूल वाहावे, नंतर नमस्कार करावा.)

सकलपूजार्थे गंधाक्षतान् पुष्पं च समर्पयामि। नमस्करोमि।

(ताम्हनातून देवीची मूर्ती काढून पुसून कलशावरील तबकात जागीं ठेवावी.) –

वस्त्रे (कलशाभोवती उपरणे गुंडाळावे व खण ठेवावा.) –

दिव्यांबरं नूतनं हि क्षौमं त्वतिमनोहरम्।
दीयमानं मया देवि गृहाण जगदंबिके॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। वस्त्रयुग्मं समर्पयामि।

भूषणे (दागिने अर्पण करावेत.) –

रक्तकंकणवैदूर्य-मुक्ताहारादिकानि च।
सुप्रसन्नेन मनसा दत्तानि स्वीकुरुष्व त्वम्॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। नानाविध – भूषणानि समर्पयामि।

चंदन – (गंध लावावे.) –

श्रीखंडागरुकर्पूरमृगनाभिसमन्वितम्।
विलेपनं गृहाणाशु नमस्ते भक्तवत्सले॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। विलेपनार्थे चंदनं समर्पयामि।

हळदकुंकू – (हळदकुंकू वाहावे.) –

हरिद्रा स्वर्णवर्णाभा सर्वसौभाग्यदायिनी।
सर्वालंकारमुख्या हि देवि त्वं प्रतिगृह्यताम्॥
हरिद्राचूर्णसंयुक्तं कुंकुमं कामदायकम्।
वस्त्रालंकारभूषार्थं देवि त्वं प्रतिगृह्यताम्॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। हरिद्राकुंकुमं सौभाग्यद्रव्यं समर्पयामि।

सिंदूर – (सिंदूर वाहावा.) –

उदितारुणसंकाशं जपाकुसुमसंनिभम्।
सीमंतभूषणार्थाय सिंदूरं प्रतिगृह्यताम्॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। सिंदूरं समर्पयामि।

परिमलद्रव्ये (अत्तर, अबीर, अष्टगंध, देवीवर व वह्यांवर वाहावे.) –

ज्योत्स्नापते नमस्तुभ्यं नमस्ते विश्वरूपिणे।
नानापरिमलद्रव्यं गृहाण परमेश्वरि।
तैलानि च सुगंधीनि द्रव्याणि विविधानि च।
मया दत्तानि लेपार्थं गृहाण परमेश्वरि॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। नानापरिमलद्रव्याणि समर्पयामि।

फुले – (देवीला फुले वाहावीत.) –

मंदारपारिजातादीन् पाटलीं केतकीं तथा।
मरुवामोगरं चैव गृहाण परमेश्वरि॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। पूजार्थे कालोद्भवपुष्पाणि समर्पयामि।

धूप – (उदबत्ती, घंटानाद करीत ओवाळावी.) –

वनस्पतिरसोद्भूतो गंधाढ्यो गंध उत्तमः।
आघ्रेयः सर्वदेवानां धूपोऽयं प्रतिगृह्यताम्॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। धूपं समर्पयामि।

दीप – (निरांजन, घंटानाद करीत ओवाळावे.) –

कार्पासवर्तिसंयुक्तं घृतयुक्तं मनोहरम्।
तमोनाशकरं दीपं गृहाण परमेश्वरि॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। दीपं समर्पयामि।

नैवेद्य- (साखरफुटाणे, बत्तासे, पेढे- जो नैवेद्य असेल तो पात्रात देवीपुढे ठेवावा. पात्राखाली पाण्याने लहानसा चौकोन करून वर पात्र ठेवावे. नैवेद्यावर तुलसीदलाने उदक प्रोक्षण करावे. **प्राणाय स्वाहा** इत्यादि प्रत्येक स्वाहाकार म्हणताना देवीला उजव्या हाताने नैवेद्य भरवीत आहोत अशी कृती करावी. नैवेद्यावर पळीभर पाणी उजव्या हाताने फिरवावे.) –

श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। (पदार्थाचे नाव)
नैवेद्यं समर्पयामि। ऋतं त्वा सत्येन परिषिंचामि।
ॐ प्राणाय स्वाहा। ॐ अपानाय स्वाहा। ॐ व्यानाय स्वाहा।
ॐ उदानाय स्वाहा। ॐ समानाय स्वाहा। ॐ ब्राह्मणे स्वाहा।

(पळीभर पाणी उजव्या हाताने ताम्हनात सोडावे) –

नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि। पुनर्नैवेद्यं समर्पयामि।
ॐ प्राणाय स्वाहा। ॐ अपानाय स्वाहा। ॐ व्यानाय स्वाहा।
ॐ उदानाय स्वाहा। ॐ समानाय स्वाहा। ॐ ब्राह्मणे स्वाहा।

(एक एक पळी पाणी ताम्हनात सोडावे) –

उत्तरापोशनं समर्पयामि। मुखप्रक्षालनं समर्पयामि। हस्तप्रक्षालनं समर्पयामि।

(पुन्हा पळीभर पाणी ताम्हनात सोडावे) –

श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। आचमनीयं समर्पयामि।

(गंध फूलाने वाहावे.)

श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि।

तांबूल – (विड्याची दोन पाने त्यांवर सुपारी ठेवून देवीसमोर ठेवावी व त्यांवर पळीभर पाणी सोडावे.)

एलालवंगकर्पूर-नागपत्रादिभिर्युतम्।
पूगीफलेन संयुक्तं तांबूलं प्रतिगृह्यताम्॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। मुखवासार्थे पूगीफल-तांबूलं समर्पयामि।

दक्षिणा – (देवीसमोर पानसुपारीवर दक्षिणाद्रव्य ठेवून त्यावर तुलसीदल, फूल ठेवून उजव्या हाताने पळीभर पाणी सोडावे.) –

हिरण्यगर्भगर्भस्थं हेमबीजं विभावसोः।
अनन्तपुण्यफलदमतः शांतिं प्रयच्छ मे॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। सुवर्णपुष्पदक्षिणां समर्पयामि।

फळे – (देवीला यथाशक्य पक्व फळे अर्पण करावीत. ती देवीपुढे ठेवून त्यांवर उजव्या हाताने पळीभर पाणी वाहावे.) –

फलेन फलितं सर्वं त्रैलोक्यं सचराचरम्।
तस्मात्फलप्रदानेन सफलाः स्युर्मनोरथाः॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः। ऋतुलब्धानि फलानि समर्पयामि।

कापूरारती – (कापूर आरती ओवाळावी. त्यावेळी घंटा वाजवावी.) –

हृत्स्थाज्ञानतमोनाशक्षमं भक्त्या समर्पितम्।
कर्पूरदीपममलं गृहाण परमेश्वरि॥

(यानंतर कापूरारती ओवाळीत 'दुर्गे दुर्घट भारी' ही आरती उपस्थित सर्वजणांनी म्हणावी व नंतर मंत्रपुष्पांजली वाहाण्यासाठी पूजकाने त्यांच्या हातात एकेक पुष्प द्यावे.)

मंत्रपुष्पांजलि – "**ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त०** पासून **सभासद इति।**" पर्यंतचे मंत्र सर्वांनी यथाशक्य सुस्वर म्हणावेत व हातातील फुले एकेकाने देवीवर वाहावीत. त्यावेळी लक्ष्मीगायत्री मंत्र म्हणावा.

लक्ष्मीगायत्री- ॐ महालक्ष्मी च विद्महे, विष्णुपत्नी च धीमहि।
तन्नो लक्ष्मी: प्रचोदयात्।
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नम:। मंत्रपुष्पं समर्पयामि।

प्रदक्षिणा-नमस्कार-प्रार्थना (स्वत:भोवती एक प्रदक्षिणा घालावी व देवीला साष्टांग नमस्कार करावा.) –

यानि कानि च पापानि ब्रह्महत्यासमानि च।
तानि तानि विनश्यंति प्रदक्षिणपदे पदे॥
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नम:। प्रदक्षिणां समर्पयामि। नमस्करोमि।

शेष-राजोपचार- (गंधाक्षता व फूल वाहावे व देवीला नमस्कार करावा.) –
श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नम:। छत्रं चामरं गीतं नृत्यं वाद्यमान्दोलनमित्यादि सर्वराजोपचारार्थे गंधपुष्पाक्षतान् समर्पयामि।
अनेन कृतपूजनेन श्रीमहालक्ष्मीसरस्वत्यौ प्रीयताम्।

दौतीची पूजा

(हात जोडून नमस्कार करावा व ध्यानाचा श्लोक म्हणावा.) –

सद्यच्छिन्नशिर: कृपाणमभयं हस्तैर्वरं बिभ्रतीम्।
घोरास्यां शिरसा स्रजं सुरुचिरमुन्मुक्तकेशावलिम्।
सृक्काऽसृक्प्रवहां श्मशाननिलयां श्रुत्यो: शवालंकृतिम्।
श्यामांगीं कृतमेखलां शवकरैर्देवीं भजे कालिकाम्॥ १॥
मषि त्वं लेखनीयुक्ता चित्रगुप्तशयस्थिता।
सदक्षराणां पात्रे च लेख्यं कुरु सदा मम॥ २॥
या माया प्रकृति: शक्तिश्चंडमुंडविमर्दिनी।
सा पूज्या सर्वदेवैश्च अस्माकं वरदा भव॥ ३॥
काल्यै नम:। ध्यानं समर्पयामि।
काल्यै नम:। आवाहनं समर्पयामि।

सर्वोपचार – (दौतीवर थोड्या गंधाक्षता, हळदकुंकू व लाल फूल वाहावे.) –

ॐ काल्यै नमः। ॐ कपालिन्यै नमः। ॐ फुल्लायै नमः। ॐ कुरुकुलायै नमः। ॐ विरोधिन्यै नमः। ॐ विप्रचितायै नमः। ॐ उग्रप्रदत्तायै नमः। ॐ नीलायै नमः। ॐ धनायै नमः। ॐ बलाकायै नमः। ॐ मात्रायै नमः। ॐ मुद्रायै नमः। ॐ महाकाल्यै नमः। सर्वोपचारार्थे गंधाक्षतान् हरिद्राकुंकुमं पुष्पं च समर्पयामि।

प्रार्थना – (नमन करून प्रार्थना म्हणावी.) –

या कालिका रोगहरा सुवंद्या। वश्यानुकूलैर्मदनातुरैश्च॥
जनैर्जनानां भयहारिणी च। सा देवमाता मयि सौख्यदात्री॥

लेखणी पूजा

ध्यान – (लेखणी, टाक, झरणी यांचे सरस्वतीरूपांत ध्यान करावे.)

शुक्लां ब्रह्मविचारसारपरमामाद्यां जगद्व्यापिनीम्।
वीणापुस्तकधारिणीमभयदां जाड्यांधकारापहाम्।
हस्ते स्फाटिकमालिकां विदधतीं पद्मासने संस्थिताम्।
वंदे त्वां परमेश्वरीं भगवतीं बुद्धिप्रदां शारदाम्॥
कृष्णानने द्विजिव्हे च चित्रगुप्तकरस्थिते।
सदक्षराणां पात्रे च लेख्यं कुरु सदा मम॥
लेखन्यै नमः। ध्यानं समर्पयामि।

सर्वोपचार – (लेखणीवर गंधाक्षता, हळदकुंकू व लाल फूल वाहावे.) –

वीणापुस्तकधारिण्यै नमः।
सर्वोपचारार्थे गंधाक्षतान् हरिद्राकुंकुमं पुष्पं च समर्पयामि।

(लेखणीला एकदा अक्षता वाहून, नमस्कार करावा.) –

ॐ वाचिन्यै नमः। ॐ वाग्वादिन्यै नमः। ॐ अजितायै नमः।
ॐ विष्णुमायायै नमः। ॐ हिंगुलायै नमः। ॐ यज्ञविद्यायै नमः।
ॐ सिद्धविद्यायै नमः। ॐ प्रज्ञायै नमः। ॐ पद्मावत्यै नमः।
ॐ भुवनेश्वर्यै नमः। ॐ लेखन्यै नमः। ॐ सरस्वत्यै नमः।
ॐ ब्रह्माण्यै नमः। ॐ भारत्यै नमः। ॐ गिरे नमः। ॐ वाचे नमः।
ॐ वाण्यै नमः। ॐ हंसगमनायै नमः। ॐ पद्महस्तायै नमः।
ॐ शारदायै नमः।

प्रार्थना – (नमस्कार करावा.) –

तरुणशकलमिन्दोर्बिभ्रती शुभ्रकांति: । कुचभरनमितांगी सन्निषण्णा सिताब्जे ।
निजकरकमलोद्यल्लेखनी पुस्तकश्री: । सकलविभवसिद्ध्यै पातु वाग्देवता माम् ॥
प्रज्ञारूपायै लेखन्यै नम: प्रार्थनां समर्पयामि ।

कुबेर पूजा

(ताम्हनात किंवा केळीच्या पानावर ठेवलेल्या चांदीच्या नाण्यांची, दागिन्यांची, नोटांची धनपति कुबेर म्हणून पूजा करावी. संपत्तीवर गंधाक्षता व फूल वाहावे. नमस्कार करावा.) –

ॐ धनदाय नमस्तुभ्यं निधिपद्माधिपाय च ।
भवंतु त्वत्प्रसादान्मे धनधान्यादिसंपद: ॥
ॐ द्रव्यनिधिस्थान-कुबेराय नम: । ध्यान-आवाहनादिसकलपूजार्थे गंधाक्षतपुष्पाणि समर्पयामि ।

तुला पूजा

(तराजू व वजने-मापे यांची पूजा)

(तराजू व वजने-मापे यांवर लाल गंध, अक्षता, हळदकुंकू व फुले वाहावीत.) –

नमस्ते सर्व देवांना शक्तित्वे सत्यमाश्रिता ।
साक्षिभूता जगद्धात्रि निर्मिता विश्वयोनिना ।
तुलायै नम: । सकलपूजार्थे गंधाक्षतपुष्पाणि हरिद्राकुंकुमं च समर्पयामि ।

दीप पूजा

(दिव्यांच्या सजावटीला गंधपुष्प, अक्षता व हळदकुंकू वाहून नमस्कार करावा.) –

भो दीप ब्रह्मरूपस्त्वमन्धकारनिवारक ।
इमां मया कृतां पूजां गृह्णन् तेज: प्रवर्तय ॥
दीपावलिं मया दत्तां गृहाण त्वं सुरेश्वरि ।
आरार्तिक्यप्रदानेन ज्ञानदृष्टिप्रदा भव ॥
अग्निर्ज्योती रवि: ज्योतिश्चन्द्रज्योतिस्तथैव च ।
उत्तम: सर्वतेजस्सु दीपोऽयं प्रतिगृह्यताम् ॥
दीपावल्यै नम: । सकलपूजार्थे गंधाक्षतान् पुष्पं हरिद्राकुंकुमं च-समर्पयामि ।

प्रार्थना – (महालक्ष्मी-महासरस्वती यांची प्रार्थना उभे राहून हात जोडून करावी.) –

नमस्ते सर्वदेवानां वरदाऽसि हरिप्रिये।
गतिर्या त्वत्प्रपन्नानां सा मे भूयात्त्वदर्चनात्॥ १॥
विश्वरूपस्य भार्याऽसि पद्मे पद्मालये शुभे।
महालक्ष्मि नमस्तुभ्यं सुखरात्रिं कुरुष्व मे॥ २॥
वर्षाकाले महाघोरे यन्मया दुष्कृतं कृतम्।
सुखरात्रिः प्रभातेऽद्य तन्मेऽलक्ष्मीं व्यपोहतु॥ ३॥
या रात्रिः सर्वभूतानां या च देवेष्ववस्थिता।
संवत्सरप्रिया या च सा ममास्तु सुमंगलम्॥ ४॥
माता त्वं सर्वभूतानां देवानां सृष्टिसंभवा।
आख्याता भूतले देवि सुखरात्रि नमोऽस्तु ते॥ ५॥
दामोदरि नमस्तेऽस्तु नमस्त्रैलोक्यमातृके।
नमस्तेऽस्तु महालक्ष्मि त्राहि मां परमेश्वरि॥ ६॥
शंखचक्रगदाहस्ते शुभ्रवर्णे शुभानने।
मह्यमिष्टवरं देहि सर्वसिद्धिप्रदायिनि॥ ७॥
नमस्तेऽस्तु महालक्ष्मि महासौख्यप्रदायिनि।
सर्वदा देहि मे द्रव्यं दानाय भुक्तिहेतवे॥ ८॥
धनं धान्यं धरां हर्म्यं कीर्तिमायुर्यशः श्रियः।
तुरगान्दन्तिनः पुत्रान्महालक्ष्मि प्रयच्छ मे॥ ९॥
यन्मया वांछितं देवि तत्सर्वं सफलं कुरु।
न बाध्यतां कुकर्माणि संकटान्मे निवारय॥ १०॥
न्यूनं वाऽप्यतुलं वापि यन्मया मोहितं कृतम्।
सर्वं तदस्तु संपूर्णं त्वत्प्रसादान्महेश्वरि॥ ११॥

आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनम्। पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वरि॥ १॥ गतं पापं गतं दुःखं गतं दारिद्र्यमेव च। आगता सुखसंपत्तिः पुण्याच्च तव दर्शनात्॥ २॥ रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि। पुत्रान्देहि धनं देहि सर्वकामांश्च देहि मे॥ ३॥ अपराधसहस्रं च क्रियतेऽहर्निशं मया। दासोऽयमिति मां मत्वा क्षमस्व परमेश्वरि॥ ४॥ यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपः पूजाक्रियादिषु। न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम्॥ ५॥ मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वरि। यत्कृतं तु मया देवि परिपूर्णम् तदस्तु मे॥ ६॥

(पूजेच्या आरंभी दिलेल्याप्रमाणे दोनदां आचमन करावे. एक एक पळी पाणी उजव्या हाताने प्राशन करावे)

ॐ केशवाय नमः। ॐ नारायणाय नमः। ॐ माधवाय नमः।

(एक पळी पाणी उजव्या हाताने ताम्हनात सोडावे) –

ॐ गोविंदाय नमः। (पुन्हा)

ॐ केशवाय नमः। ॐ नारायणाय नमः। ॐ माधवाय नमः।

(एक पळीभर पाणी उजव्या हाताने ताम्हनात सोडावे) –

ॐ गोविंदाय नमः। ॐ विष्णवे नमः। ॐ मधुसूदनाय नमः।
ॐ त्रिविक्रमाय नमः। ॐ वामनाय नमः। ॐ श्रीधराय नमः।
ॐ हृषीकेशाय नमः। ॐ पद्मनाभाय नमः। ॐ दामोदराय नमः।
ॐ संकर्षणाय नमः। ॐ वासुदेवाय नमः। ॐ प्रद्युम्नाय नमः।
ॐ अनिरुद्धाय नमः। ॐ पुरुषोत्तमाय नमः। ॐ अधोक्षजाय नमः।
ॐ नारसिंहाय नमः। ॐ अच्युताय नमः। ॐ जनार्दनाय नमः।
ॐ उपेन्द्राय नमः। ॐ हरये नमः। ॐ श्रीकृष्णाय नमः।

(यानंतर प्राणायाम करावा.) –

अनेन यथाज्ञानेन यथामीलित उपचारद्रव्यैर्मया कृतषोडशोपचार – पूजनेन भगवत्यः श्रीमहालक्ष्मी- सरस्वत्यादिदेवताः प्रीयन्ताम् न मम। ॐ तत्सन्महालक्ष्म्यै समर्पणमस्तु॥

(पळीभर पाणी उजव्या हातावरून ताम्हनात सोडावे व पूजकाने नमस्कार करावा.)

ब्राह्मण पूजा

(पूजकाने गंधाक्षता फूल, विडा, दक्षिणा व नारळ पुरोहिताला अर्पण करून नमस्कार करावा.) –

नमोऽस्त्वनंताय सहस्रमूर्तये। सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ॥

सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते। सहस्रकोटियुगधारिणे नमः।

(पुरोहिताने आशीर्वाद द्यावा) –

दीर्घमायुः श्रेयः शांतिः पुष्टिश्चास्तु। शुभं भवतु।

पूजा झाल्यावर फटाके वाजवावेत नंतर सर्वांना प्रसाद, पानसुपारी, अत्तर, गुलाबपाणी, शीत किंवा उष्ण पेये यथाशक्ती देऊन संतुष्ट करावे. रात्री यथाशक्ती जागर करून करमणुकीचे कार्यक्रम करावेत.

(रात्री निजण्यापूर्वी (सुपारीवर) गणपतीवर गंधाक्षता व फूल वाहावे.) –

यांतु देवगणा सर्वे पूजामादाय मामकीम्।

इष्टकाम-प्रसिद्ध्यर्थं पुनरागमनाय च ॥

अशा प्रकारे गणपतीचे विसर्जन करावे. इतर देवतांचे, देवीचे व वह्या, तराजू, इत्यादींचे विसर्जन नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी पूजा साहित्य आवरावे. निर्माल्य मोठ्या जलाशयात टाकावे. पूजेची उपकरणी पुन्हा घरात जागीं ठेवावी. मूर्ती, तसबिरी घरात होत्या तेथे ठेवाव्यात. ब्राह्मणाला तांदूळ, वस्त्र, फळे, दक्षिणा, लोकांनी अर्पण केलेले द्रव्य आदि जे योग्य ते द्यावे. धन, नाणी, दागिने आदि काळजीपूर्वक उचलून जागच्या जागी व्यवस्थित ठेवावेत.

सूचना – रात्री देवीला निद्रा घेण्यासाठी एका पाटावर रांगोळीने कमलाकृती काढावी, तीत हळदकुंकू भरावे, मूर्ती तेथे ठेवावी व देवीने तेथे निद्रा घ्यावी अशी मनोमन प्रार्थना करावी. (ही पद्धत काही लोकांत आहे.)

महत्त्वाची सूचना

केवळ **श्रीमहागणपतये नमः** व **श्रीमहालक्ष्मीसरस्वतीभ्यां नमः।** अशा नाममंत्रानीही हा पूजाविधी करतां येतो. स्वतः पूजा करताना त्याचा उपयोग होईल.

॥ इति पूजाविधिः समाप्तः ॥

श्रीमहालक्ष्मीपूजनविधावाभिषेकार्थम्

देव्या अष्टोत्तर-शतनामावलिः।

संकल्प – अद्य श्रीलक्ष्मीसरस्वतीपूजनांगत्वेन अष्टोत्तरशत – नामभिर्देव्या अभिषेकं करिष्ये।

ध्यानम्।

या सा पद्मासनस्था विपुलकटितटी पद्मपत्रायताक्षी।
गंभीरावर्तनाभिः स्तनभरनमिता शुभ्रवस्त्रोत्तरीया॥
या लक्ष्मीर्दिव्यरूपैर्मणिगणखचितैः स्नापिता हेमकुंभैः।
सा नित्यं पद्महस्ता मम वसतु गृहे सर्वमांगल्ययुक्ता॥ १॥
या कुंदेन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता।
या वीणावरदण्डमण्डित करा या श्वेतपद्मासना॥
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा॥ २॥

श्रीमहालक्ष्मी-अष्टोत्तरशत-नामावलिः।

(प्रत्येक नामापूर्वी ॐ म्हणावा)

१) आदित्यशक्तये नमः।	२) महादेव्यै नमः।	३) अंबिकायै नमः।
४) परमेश्वर्यै नमः।	५) ईश्वर्यै नमः।	६) अनैश्वर्यै नमः।
७) योगिन्यै नमः।	८) सर्वभूतेश्वर्यै नमः।	९) जपायै नमः।
१०) विजयंतायै नमः।	११) जयंत्यै नमः।	१२) शांभव्यै नमः।
१३) शांत्यै नमः।	१४) ब्राह्मये नमः।	१५) ब्रह्मांडधारिण्यै नमः।
१६) महारूपायै नमः।	१७) महामायायै नमः।	१८) माहेश्वर्यै नमः।
१९) लोकरक्षिण्यै नमः।	२०) दुर्गायै नमः।	२१) दुर्गपारायै नमः।
२२) भक्तचिंतामण्यै नमः।	२३) मृत्यै नमः।	२४) सिद्ध्यै नमः।
२५) मूर्त्यै नमः।	२६) सर्वसिद्धिप्रदायै नमः।	२७) मंत्रमूर्त्यै नमः।
२८) महाकाल्यै नमः।	२९) सर्वमूर्तिस्वरूपिण्यै०	३०) वेदमूर्त्यै नमः।
३१) वेदभूत्यै नमः।	३२) वेदान्तायै नमः।	३३) व्यवहारिण्यै नमः।
३४) अनघायै नमः।	३५) भगवत्यै नमः।	३६) रौद्रायै नमः।
३७) रुद्रस्वरूपिण्यै नमः।	३८) नारायण्यै नमः।	३९) नारसिंह्यै नमः।

४०) नागयज्ञोपवीतिन्यै०
४१) शंखचक्रगदाधारिण्यै०
४२) जटामुकुटशोभिन्यै०
४३) अप्रमाणायै नमः।
४४) प्रमाणायै नमः।
४५) आदिमध्यावसानायै०
४६) पुण्यदायै नमः।
४७) पुण्योपचारिण्यै नमः।
४८) पुण्यकीर्त्यै नमः।
४९) स्तुतायै नमः।
५०) विशालाक्ष्यै नमः।
५१) गंभीरायै नमः।
५२) रूपान्वितायै नमः।
५३) कालरात्र्यै नमः।
५४) अनल्पसिद्ध्यै नमः।
५५) कमलायै नमः।
५६) पद्मवासिन्यै नमः।
५७) महासरस्वत्यै नमः।
५८) मनःसिद्धायै नमः।
५९) मनोयोगिन्यै नमः।
६०) मातंगिन्यै नमः।
६१) चंडमुंडघातिन्यै नमः।
६२) दैत्यदानवनाशिन्यै०
६३) मेषज्योतिषे नमः।
६४) परंज्योतिषे नमः।
६५) आत्मज्योतिषे नमः।
६६) सर्वज्योतिःस्वरूपिण्यै०
६७) सहस्रमूर्त्यै नमः।
६८) शर्वाण्यै नमः।
६९) सूर्यमूर्तिस्वरूपिण्यै०
७०) आयुर्लक्ष्म्यै नमः।
७१) विद्यालक्ष्म्यै नमः।
७२) सर्वलक्ष्मीप्रदायै०
७३) विचक्षणायै नमः।
७४) क्षीरार्णववासिन्यै०
७५) वागीश्वर्यै नमः।
७६) वाक्सिद्ध्यै नमः।
७७) अज्ञानज्ञानगोचरायै०
७८) बलायै नमः।
७९) परमकल्याण्यै नमः।
८०) भानुमंडलवासिन्यै०
८१) अव्यक्तायै नमः।
८२) व्यक्तरूपायै नमः।
८३) अव्यक्तरूपायै नमः।
८४) अनंतायै नमः।
८५) चंद्रायै नमः।
८६) चंद्रमंडलवासिन्यै०
८७) चंद्रमंडलमंडितायै०
८८) भैरव्यै नमः।
८९) परमानंदायै नमः।
९०) शिवायै नमः।
९१) अपराजितायै नमः।
९२) ज्ञानप्राप्तये नमः।
९३) ज्ञानवत्यै नमः।
९४) ज्ञानमूर्त्यै नमः।
९५) कलावत्यै नमः।
९६) स्मशानवासिन्यै नमः।
९७) मात्रे नमः।
९८) परमकल्पिन्यै नमः।
९९) घोषवत्यै नमः।
१००) दारिद्र्यहारिण्यै नमः।
१०१) शिवतेजोमुख्यै नमः।
१०२) विष्णुवल्लभायै नमः।
१०३) केशविभूषितायै नमः।
१०४) कूर्मायै नमः।
१०५) महिषासुरघातिन्यै०
१०६) सर्वरक्षायै नमः।
१०७) महाकाल्यै नमः।
१०८) श्रीमहालक्ष्म्यै नमः।

अनेनाष्टोत्तरशतसंख्याकजपाभिषेककर्मणा भगवती श्रीमहालक्ष्मीः प्रीयताम्।

॥ संपूर्णोऽयं पूजाविधिः ॥

अथ श्रीमहालक्ष्मीस्तोत्रम्।

श्रीगणेशाय नमः॥ ॥ पद्मे पद्मपलाशाक्षि जय त्वं श्रीपतिप्रिये। जय मातर्महालक्ष्मि संसारार्णवतारिणि॥१॥ महालक्ष्मि नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं सुरेश्वरि। हरिप्रिये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं दयानिधे॥२॥ पद्मालये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं च सर्वदे। सर्वभूतहितार्थाय वसुवृष्टिं सदा कुरु॥३॥ जगन्मातर्नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं दयानिधे। दयावति नमस्तुभ्यं विश्वेश्वरि नमोऽस्तु ते॥४॥ नमः क्षीरार्णवसुते नमस्त्रैलोक्यधारिणि। वसुवृष्टे नमस्तुभ्यं रक्ष मां शरणागतम्॥५॥ रक्ष त्वं देवदेवेशि देवदेवस्य वल्लभे। दारिद्र्यात्त्राहि मां लक्ष्मि कृपां कुरु ममोपरि॥६॥ नमस्त्रैलोक्यजननि नमस्त्रैलोक्यपावनि। ब्रह्मादयो नमंति त्वां जगदानंददायिनि॥७॥ विष्णुप्रिये नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं जगद्धिते। आर्तिहंत्रि नमस्तुभ्यं समृद्धिं कुरु मे सदा॥८॥ अब्जवासे नमस्तुभ्यं चपलायै नमो नमः। चंचलायै नमस्तुभ्यं ललितायै नमो नमः॥९॥ नमः प्रद्युम्नजननि मातस्तुभ्यं नमो नमः। परिपालय भो मातर्मां तुभ्यं शरणागतम्॥१०॥ शरण्ये त्वां प्रपन्नोऽस्मि कमले कमलालये। त्राहि त्राहि महालक्ष्मि परित्राणपरायणे॥११॥ पांडित्यं शोभते नैव न शोभंति गुणा नरे। शीलत्वं नैव शोभेत महालक्ष्मि त्वया विना॥१२॥ तावद्विराजते रूपं तावच्छीलं विराजते। तावद्गुणा नराणां च यावल्लक्ष्मीः प्रसीदति॥१३॥ लक्ष्मि त्वयालंकृतमानवा ये पापैर्विमुक्ता नृपलोकमान्याः। गुणैर्विहीना गुणिनो भवंति दुःशीलिनः शीलवतां वरिष्ठाः॥१४॥ लक्ष्मीर्भूषयते रूपं लक्ष्मीर्भूषयते कुलम्। लक्ष्मीर्भूषयते विद्यां सर्वाल्लक्ष्मीर्विशिष्यते॥१५॥ लक्ष्मि त्वद्गुणकीर्तनेन कमलाभूर्यात्यलं जिह्मतां। रुद्राद्या रविचंद्रदेवपतयो वक्तुं च नैव क्षमाः। अस्माभिस्तव रूपलक्षणगुणान्वक्तुं कथं शक्यते। मातर्मां परिपाहि विश्वजननि कृत्वा ममेष्टं ध्रुवम्॥१६॥ दैन्यार्तिभीतं भवतापपीडितं धनैर्विहीनं तव पार्श्वमागतम्। कृपानिधित्वान्मम लक्ष्मि सत्वरं धनप्रदानाद्धननायकं कुरु॥१७॥ मां विलोक्य जननि हरिप्रिये निर्धनं तव समीपमागतम्। देहि मे झटिति लक्ष्मि कराग्रं वस्त्रकांचनवरान्नमद्भुतम्॥१८॥ त्वमेव जननी लक्ष्मि पिता लक्ष्मि त्वमेव च। भ्राता त्वं च सखा लक्ष्मि विद्या लक्ष्मि त्वमेव च॥१९॥ त्राहि त्राहि महालक्ष्मि त्राहि त्राहि सुरेश्वरि। त्राहि त्राहि जगन्मातर्दारिद्र्यात्त्राहि वेगतः॥२०॥ नमस्तुभ्यं जगद्धात्रि नमस्तुभ्यं नमो नमः। धर्माधारे नमस्तुभ्यं

नमः संपत्तिदायिनि ॥ २१ ॥ दारिद्र्यार्णवमग्नोऽहं निमग्नोऽहं रसातले। मज्जंतं मां करे धृत्वा सूद्धर त्वं रमे द्रुतम् ॥ २२ ॥ किं लक्ष्मि बहुनोक्तेन जल्पितेन पुनः पुनः। अन्यन्मे शरणं नास्ति सत्यं सत्यं हरिप्रिये ॥ २३ ॥ एतच्छ्रुत्वाऽगस्तिवाक्यं हृष्यमाणा हरिप्रिया। उवाच मधुरां वाणीं तुष्टाऽहं तव सर्वदा ॥ २४ ॥ लक्ष्मीरुवाच। यत्त्वयोक्तमिदं स्तोत्रं यः पठिष्यति मानवः। श्रृणोति च महाभागस्तस्याहं वशवर्तिनी ॥ २५ ॥ नित्यं पठति यो भक्त्या त्वलक्ष्मीस्तस्य नश्यति। ऋणं च नश्यते तीव्रं वियोगं नैव पश्यति ॥ २६ ॥ यः पठेत्प्रातरुत्थाय श्रद्धाभक्तिसमन्वितः। गृहे तस्य सदा स्थास्ये नित्यं श्रीपतिना सह ॥ २७ ॥ सुखसौभाग्यसंपन्नो मनस्वी बुद्धिमान् भवेत्। पुत्रवान् गुणवान् श्रेष्ठो भोगभोक्ता च मानवः ॥ २८ ॥ इदं स्तोत्रं महापुण्यं लक्ष्म्यगस्तिप्रकीर्तितम्। विष्णुप्रसादजननं चतुर्वर्गफलप्रदम् ॥ २९ ॥ राजद्वारे जयश्चैव शत्रोश्चैव पराजयः। भूतप्रेतपिशाचानां व्याघ्राणां न भयं तथा ॥ ३० ॥ न शस्त्रानलतो यौधाद्भयं तस्य प्रजायते। दुर्वृत्तानां च पापानां बहुहानिकरं परम् ॥ ३१ ॥ मंदुराकरिशालासु गवां गोष्ठे समाहितः। पठेत्तद्दोषशांत्यर्थं महापातकनाशनम् ॥ ३२ ॥ सर्वसौख्यकरं नृणामायुरारोग्यदं तथा। अगस्तिमुनिना प्रोक्तं प्रजानां हितकाम्यया ॥ ३३ ॥

इत्यगस्तिविरचितं श्रीमहालक्ष्मीस्तोत्रं संपूर्णम्।

॥ श्रीसूक्तम् ॥

(लक्ष्मीसूक्तसमेतम् ।)

श्रीगणेशाय नमः॥ अथ श्रीमहालक्ष्म्यै नमः॥

हिरण्यवर्णामिति पंचदशर्चस्य सूक्तस्य

आनंदकर्दम चिक्लीतेंदिशसुता ऋषयः॥

श्रीरग्निश्चेत्युभे देवते॥ आद्यास्तिस्रोऽनुष्टुभः॥

चतुर्थी बृहती॥ पंचमीषष्ट्यौ त्रिष्टुभौ॥

ततोऽष्टावनुष्टुभः॥ अंत्या प्रस्तारपंक्तिः॥

जपे विनियोगः॥

हरि ॐ हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्रजाम्।

चंद्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह॥१॥

तां म आवह जातवेदो लक्ष्मीम् अनपगामिनीम्।

यस्यां हिरण्यं विन्देयं गाम् अश्वं पुरुषान् अहम्॥२॥

अश्वपूर्वां रथमध्यां हस्तिनादप्रबोधिनीम्।

श्रियं देवीम् उपह्वये श्रीर्मा देवीर्जुषताम्॥३॥

कां सोस्मितां हिरण्यप्राकाराम् आर्द्रां ज्वलन्तीम् तृप्तां तर्पयन्तीम्।

पद्मे स्थितां पद्मवर्णाम् ताम् इह उपह्वये श्रियम्॥४॥

चन्द्रां प्रभासां यशसा ज्वलन्तीम् श्रियं लोके देवजुष्टाम् उदाराम्।

तां पद्मिनीम् ईं शरणं अहं प्रपद्ये अलक्ष्मीः मे नश्यतां त्वां वृणे॥५॥

आदित्यवर्णे तपसोऽधिजातो वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्वः।

तस्य फलानि तपसा नुदन्तु मायान्तरा याश्च बाह्या अलक्ष्मीः॥६॥

उपैतु मां देवसखः कीर्तिश्च मणिना सह।

प्रादुर्भूतः सुराष्ट्रेऽस्मिन् कीर्तिं ऋद्धिं ददातु मे॥७॥

क्षुत्पिपासामलां ज्येष्ठाम् अलक्ष्मीं नाशयाम्यहम्।
अभूतिं असमृद्धिं च सर्वां निर्णुद मे गृहात्॥८॥
गंधद्वारां दुराधर्षां नित्यपुष्टां करीषिणीम्।
ईश्वरीं सर्वभूतानाम् ताम् इहोपह्वये श्रियम्॥९॥
मनस: काममाकूतिम् वाच: सत्यम् अशीमहि।
पशूनां रूपं अन्नस्य मयि श्री: श्रयतां यश:॥१०॥
कर्दमेन प्रजाभूता मयि संभव कर्दम।
श्रियं वासय मे कुले मातरं पद्ममालिनीम्॥११॥
आप: स्रजन्तु स्निग्धानि चिक्लीत वस मे गृहे।
नि च देवीं मातरम् श्रियं वासय मे कुले॥१२॥
आर्द्रां पुष्करिणीं पुष्टिं पिंगलां पद्ममालिनीम्।
चन्द्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह॥१३॥
आर्द्रां य:करिणीं यष्टिं सुवर्णां हेममालिनीम्।
सूर्यां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह॥१४॥
तां म आवह जातवेदो लक्ष्मीम् अनपगामिनीम्।
यस्यां हिरण्यं प्रभूतं गावो दास्योऽश्वान् विन्देयं पुरुषान् अहम्॥१५॥
य: शुचि: प्रयतो भूत्वा जुहुयाद् आज्यम् अन्वहम्।
सूक्तं पंचदशर्चं च श्रीकाम: सततं जपेत्॥१६॥

अथ लक्ष्मीसूक्तम्।

पद्मानने पद्मऊरू पद्माक्षि पद्मसंभवे।
तन्मे भजसि पद्माक्षि येन सौख्यं लभाम्यहम्॥१॥
अश्वदायैगोदायै धनदायैमहाधने।
धनंमेलभतांदेवि सर्व कामांश्च देहिमे॥२॥

पद्मानने पद्मविपद्मपत्रे पद्मप्रिये पद्मदलायताक्षि।
विश्वप्रिये विश्वमनोऽनुकूले त्वत्पादपद्मं मयि संनिधत्स्व॥ ३॥
पुत्रपौत्रं धनं धान्यं हस्त्यश्वादिगवेरथम्।
प्रजानां भवसि माता आयुष्मन्तं करोतु मे॥ ४॥
धनमग्निर्धनं वायुर्धनं सूर्यो धनं वसुः।
धनमिन्द्रो बृहस्पतिर्वरुणं धनमस्तु मे॥ ५॥
वैनतेय सोमं पिब सोमं पिबतु वृत्रहा।
सोमं धनस्य सोमिनो मह्यं ददातु सोमिनः॥ ६॥
न क्रोधो न च मात्सर्यं न लोभो नाशुभा मतिः।
भवन्ति कृतपुण्यानां भक्तानां श्रीसूक्तं जपेत्॥ ७॥
सरसिज-निलये सरोजहस्ते धवलतरांशुक-गन्ध-माल्य-शोभे।
भगवति हरिवल्लभे मनोज्ञे त्रिभुवनभूतिकरि प्रसीद मह्यम्॥ ८॥
विष्णुपत्नीं क्षमां देवीं माधवीं माधवप्रियाम्।
विष्णोः प्रियसखीं देवीं नमाम्यच्युतवल्लभाम्॥ ९॥
महालक्ष्म्यै च विद्महे विष्णुपत्न्यै च धीमहि।
तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात्॥ १०॥
आनन्दः कर्दमः श्रीदः चिक्लीतं इति विश्रुताः॥
ऋषयश्च श्रियः पुत्रा मयि श्रीर्देविदेवताः॥ ११॥
ऋणरोगादि-दारिद्र्यं पापञ्च अपमृत्यवः।
भयशोक-मनस्तापाः नश्यन्तु मम सर्वदा॥ १२॥
श्रीर्वर्चस्वम् आयुष्यम् आरोग्यम् आविधात् शोभमानं महीयते।
धान्यं धनं पशुं बहुपुत्रलाभं शतसंवत्सरं दीर्घमायुः॥ १३॥

॥ एवं श्रीसूक्तम् लक्ष्मीसूक्तम् च॥

卐 卐 卐

